# पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५

## प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का.५, दि.१३/११/२०२५ अन्वये पनवेल महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषित केला आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु /पुर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रभाग निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. २०/११/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणीत करुन प्रसिध्द करणे. | दि.५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे | दि.०८/१२/२०२५ |
| ५ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.१२/१२/२०२५ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील कलम ७ अ च्या तरतूदीन्वये, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या १८८- पनवेल विधानसभा मतदार संघाच्या दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांवरुन पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारुप मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत व त्या मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये आज दिनांक २०/११/२०२५ रोजी खालील नमूद ठिकाणी त्यासमोर नमुद निवडणुक प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या माहितीसाठी आणि निरीक्षणासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्र. |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती अ अंतर्गत उप विभाग नावडे, | १,२,३ |
| २ | प्रभाग समिती अ कार्यालय, खारघर | ४,५,६ |
| ३ | प्रभाग समिती ब कळंबोली | ७,८,९,१० |
| ४ | प्रभाग समिती क कामोठे | ११,१२,१३, |
| ५ | प्रभाग समिती ड पनवेल | १४,१५,१६,१७,१८,१९,२० |

तसेच, प्रस्तुत १ ते २० प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईटवर व निवडणूक विभाग, मुख्यालय, पनवेल महानगरपालिका, गोखले हॉलजवळ येथे निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

१. सदरील प्रारुप मतदार याद्यांवर कोणाच्या हरकती अगर सूचना असल्यास त्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे सर्व संबंधित प्रभाग कार्यालय, पनवेल महानगरपालिका मुख्यालय येथे दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत दाखल करता येतील.

२. हरकती व सूचना सादर करण्याचे विहित नमुने पनवेल महानगरपालिका मुख्यालय, तसेच प्रभाग समिती कार्यालये व महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विहित नमुन्यातच हरकती/सूचना/तक्रारी स्विकारल्या जातील, याची नोंद घ्यावी.

३. कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रीत यादीच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.

४. मुदतीनंतर आलेल्या हरकती/सूचना स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**- स्वाक्षरी-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- १९/११/२०२५**